महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बुलडाणा
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा ४४३००१ (दु.क्र. २४२२४५)
Email- socialwelfare.buldana63@gmail.com

जावक क्र. सआसकबु/ भासशि/ महाडीबीटी/मुदतवाढ/२०१९/ 2219 /बुलडाणा/दिनांक : 19.7.2019

**कारणे दाखवा नोटीस**

प्रति,
प्राचार्य,
--------------------------------
--------------------------------
--------------------------------

**विषय : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाडीबीटी या संगणकीय प्रणालीवरील इमाव प्रवर्गाचे अर्ज अद्यापही महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याबाबत.**

**संदर्भ :१. या कार्यालयाचे पत्र क्र. सआसकबु / भासशि / महाडीबीटी / मुदतवाढ / १८३५ / दि. ११.६.२०१९**
**२. या कार्यालयाचे पत्र क्र. सआसकबु / भासशि / महाडीबीटी / मुदतवाढ / १९३५ / दि. २८.६.२०१९**
**३. या कार्यालयाचे पत्र क्र. सआसकबु / भासशि / महाडीबीटी / मुदतवाढ / १८३५ / दि. २.७.२०१९**
**४. महाडिबीटी या संगणकीय प्रणालीवरील डॅशबोर्ड दिनांक १६.७.२०१९**

**महोदय,**

आपणास याद्वारे कळविण्यात येते की, महाडिबीटी या संगणकीय प्रणालीवरील डॅशबोर्ड दिनांक १६.७.२०१९ रोजी आढावा घेतला असता अजुनही भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे इमाव प्रवर्गाचे ३७६ अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे निर्देशनास येत आहे. शेवटची संधी म्हणुन महाडीबीटी या संगणकीय प्रणालीवर ~~भारत सरकार मॅट्रीकोत्तर~~ शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर योजनेच्या पात्र अनु. जाती, इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रलंबित अर्ज महाविद्यालयांना जिल्हास्तरावर ऑनलाईन सादर करण्यासाठी महाडीबीटी ही संगणकीय प्रणालीस दिनांक ९.७.२०१९ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु अद्यापही आपल्या महाविद्यालयाचे इमाव प्रवर्गाचे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी / परिक्षा फी योजने अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. यावरुन असे



3798 दिनांक 20/8/19

निर्देशनास येते की, आपली भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेविषयी कमालीची उदासिनता आहे. ही प्रशासकीयदृष्टया अत्यंत गंभीर बाब आहे. पात्र विद्यार्थी भारत शि योजनेपासुन वंचित राहील्यास व भविष्यात याबाबत काही तक्रार निर्माण झाल्यास यास आपण प्राचार्य म्हणुन व्यक्तीशः जबाबदार राहाल याची गांभियाने नोंद घ्यावी.

तेव्हा आपण आपल्या महाविद्यालय स्तरावरील महाडीबीटी या संगणकीय प्रणालीवर प्रलंबित असलेले भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेच्या विद्यार्थी नावासह प्रलंबित कारणासह स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पत्र मिळाल्यापासुन तीन दिवसाचे आत खुलासा या कार्यालयास सादर करावा. विहीत कालावधीत आपला खुलासा अप्राप्त असल्यास आपले याबाबत काहीही म्हणे नाही असे गृहीत धरुन पुढील प्रशासकीय कार्यवाहीसाठी आपल्या वरिष्ठ कार्यालयास आपल्या महाविद्यालयाचे नावे कळविण्यात येईल याची गांभियाने महाविद्यालय प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

**महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले इमाव प्रवर्गाचे महाडीबीटी प्रणालीवरील शैक्षणिक सत्र २०१८-१९ चे प्रलंबित अर्ज**

| अ.क्र. | प्रवर्ग | शिष्यवृत्ती अर्ज संख्या | फ्रिशीप अर्ज संख्या | एकुण अर्ज संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | इमाव | ३०८ | ७६ | ३७६ |

(डॉ. अनिता राठोड)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, बुलडाणा

**प्रतिलिपी : माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. मा. सचांलक, विजाभज, इमाव व विमाप्र आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
३. मा. जिल्हाधिकारी बुलडाणा.
४. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग अमरावती.
५. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती.
६. कुलसचिव, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला.
७. सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती.
८. सहसंचालक, तंत्रशिक्षण अमरावती.
९. शिक्षण उपसंचालक, अमरावती.

-स्वा-
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, बुलडाणा



प्र. क्र. विभाअ / तंशि / २०१९ / १८६६
सहसंचालक तंत्रशिक्षण वि.का.
अमरावती
दि. 21 AUG 2019

प्रत: प्राचार्य व्यावसायीक पदवी, पदवीका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था बुलडाणा जिल्हा बुलडाणा यांना कळविण्यात येते की, उपरोक्त दिलेल्या पत्राप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत: प्रोग्रामर तंत्रशिक्षण वि.का. अम. यांना वेबसाईटवर टाकण्याकरीता